**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४२/२०१६-१७/५० दिनांक: १०.०२.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ४२/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुभाष दत्तू पाटील<br>मु. पो. मंगळवार पेठ, जत<br>ता. जत, जिल्हा. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय जाहीर करित आहे.

१) तक्रारदार यांना माहे जुलै व ऑगस्ट २०१६ ची दिलेली अत्यंत अवास्तव वीज देयके दरमहा १०० युनिट वापर गृहीत धरुन दुरस्त करुन मिळावीत व जादा भरुन घेतलेली देयकाची रक्कम त्यांना परत द्यावी अगर त्यावर व्याज देऊन समायोजित करावीत या मागणीसाठी प्रस्तुत गा-हाणे दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार श्री सुभाष दत्तू पाटील यांचे मौजे शेडयाळ ता. जत येथील शेतात घर असून तेथे ग्राहक क्र. २७०२९०४७३३४६ ची वीज जोडणी मार्च २०११ पासून चालू असून वि.प. यांनी दरमहाची फोटो रिडींग घेऊन दिलेली देयके तक्रारदार यांनी भरलेली आहेत. वीज मिटर चांगले चालू आहे. रिडींग होत असूनही दरमहा ६०युनिट वापराची देयके तक्रारदार यांना दिलेली आहेत. जुलै व ऑगस्ट २०१६ ची देयके मात्र अवास्तव (Abnormal) रक्कमेची दिली आहेत. त्याबाबत लेखी तक्रार केल्यानंतर ऑगस्ट २०१६ नंतर मीटर बदलणेत आले. शाखा अभियंता यांच्या अहवालानुसार तक्रारदार यांचा सरासरी वीज वापर दरमहा १०० युनिट आहे. हा अहवाल तक्रारदार यांना मान्य आहे. जुलै व ऑगस्ट २०१६ ची देयके रु. १,०१,७७०/- इतक्या प्रचंड रक्कमेची तक्रारदार यांना देणेत आली. मात्र त्यानंतर सदर देयके दुरुस्त करुन रु. १६,०००/- चे देयक देण्यात आले ती रक्कम Under Protest भरली आहे. कोणत्या कायद्याच्या आधारे दुरुस्त बिल १६,०००/- रु. चे दिले हे स्पष्ट केले नाही. तक्रारदार यांनी त्यानंतर दिनांक ०५-१०-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. तक्रारदारांचे मीटर कोणी केव्हा व का तपासले हे समजू दिले नाही. तक्रारदार यांना सदर तपासणी अहवाल मान्य नाही. त्याना मीटर तपासणी अहवाल दिलेला नाही. वाद केवळ दोन महिन्यांच्या देयकाचा आहे. कक्षाच्या आदेशाने समाधान न झालेने तक्रारदार यांनी हे अपिल दाखल केले आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

३) तक्रारदार यांनीच वीज मिटर व्यवस्थित चालत नसलेबाबत अर्ज करुन आणि मिटर तपासणीसाठी रु. १५०/- दिनांक ३१.०८.२०१६ रोजी वि.प.कडे भरले होते. मीटर चाचणी अहवालानुसार वीज देयक सुधारीत करुन देण्यात आले व ते तक्रारदार यांनी भरले होते. तक्रारदार यांना जून २०१५ पासून जुलै-२०१६ पर्यन्त सरासरी ६० युनिट वापराप्रमाणे दिलेली देयके त्यांनी भरली आहेत. दिलेले देयक २ महिन्यांचे नसून १४ महिन्याचे आहे. ते योग्य व बरोबर आहे (वि.प. यांनी लेखी उत्तरात CPL जोडला आहे असे नमूद केले, पण जोडलेले नाही)

४) सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०२.२०१७ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरीभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री दराडे व उपकार्यकारी अभियंता श्री मैलापूरे यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली.

५) सर्व परिस्थितीचा विचार करता या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांच्या विनंतीप्रमाणे माहे जुलै-२०१६ व ऑगस्ट २०१६ ची वीज देयके दरमहा १०० युनिट असा वापर गृहीत धरुन दुरस्त करणेचा आदेश करणे योग्य होईल काय?
उत्तरः- होय. परंतु त्यासोबत मागिल १२ महिन्याच्या सरासरीच्या देयकांची दुरुस्ती करणे योग्य आहे.

२) कोणता अंतिम आदेश ?
उत्तरः- शेवटी नमूद केल्यानुसार.

**कारणमिमांसा**

६) तक्रारदार यांच्या शेतजमिनीतील घरात वीज जोडणी ग्राहक क्र.२७०२९०४७३३४६ ही मार्च २०११ पासून चालू आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे मीटर रिडींग घेतले जाऊनही दरमहा ६० युनिट वापराची वीज देयके दिली गेली होती. त्यांनी दाखल केलेल्या वीज देयकाच्या झेरॉक्स प्रती वरुन असे दिसते की, जुलै-२०१५ पासून जून २०१६ पर्यन्त त्यांना दरमहा ६० युनिट वापराची देयके देणेत आली होती. वि.प. यांनी CPL उतारा दाखल केलेला नाही.

७) तक्रारदार यांचे म्हणणे असे की, वीज मिटर चांगले होते व त्याबाबत त्यांची तक्रार नव्हती आणि वीज मिटर कोणी , केव्हा व का तपासले हे समजू दिलेले नाही. तथापि दिनांक २६-१०-२०१६ च्या मीटर तपासणी अहवालानुसार दिनांक ३१-०८-२०१६ रोजी पावती क्र. ४९४४४५२ प्रमाणे मीटर तपासणीचे रु. १५०/- भरल्यानंतर दिनांक १९-१०-२०१६ रोजी मीटर तपासले असता ते सदोष (Faulty) असल्याचे आढळून आले. सदरची रक्कम रु. १५०/- तक्रारदार यांनीच भरली असावी. मात्र मीटर तपासणी अहवालाची प्रत तक्रारदार यांना देणेत आली नव्हती असे दिसते.

८) वि.प. यांनी त्यांच्या दिनांक १६-०१-२०१७ च्या लेखी निवेदनातील परिच्छेद ३ मध्ये नमूद केले आहे की, तक्रारदार यांचा दरमहा वीज वापर ६० युनिटपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास येते. तक्रारदार यांनी असे मान्य केले आहे की, त्यांचा दरमहाचा वीज वापर (संबंधीत कालावधीत) १०० युनिटचा होता. याबाबत तक्रारदार यांना उपकार्यकारी अभियंता अगर अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचा त्या संदर्भातील अहवाल मान्य आहे.

९) वरील विवेचनावरुन प्रथमदर्शनी असा निष्कर्ष काढता येईल की, जुलै-२०१५ पासून ऑगस्ट २०१६ या १४ महिन्याच्या कालावधीत तक्रारदार यांचा वीज वापर दरमहा १०० युनिट म्हणजे एकूण १४०० युनिट झाला होता. वि.प. यांनी असे लेखी कथन कले आहे की, तक्रारदार यांचे दुरुस्त केलेले देयक २ महिन्याचे नसून १४ महिन्यांचे आहे. तोंडी युक्तिवादाचे वेळी वि.प. तर्फे असे सांगणेत आले की, दुरुस्त केलेले देयक १४ महिन्यांचे १४०० युनिटचे दिले आहे.

१०) तथापि, सदरच्या संपूर्ण १४ महिन्यांच्या काळातील संपूर्ण १४०० युनिटचे देयक देता येणार नाही. वरील १२ महिन्यांची दरमहा सरासरी ६० युनिटची वीज देयके तक्रारदार यांनी भरलेली आहेत, याबद्दल उभय पक्षात वाद नाही. त्यामुळे सदर १२ महिन्यांची उर्वरीत प्रत्येकी ४० युनिटची देयक ४० X १२ = ४८० इतके युनिटचे होईल. तसेच जुलै व ऑगस्ट २०१६ या दोन महिन्यांचे २०० युनिटचे देयक होते. म्हणजे ४८० + २०० = ६८० युनिटचे देयक तक्रारदार यांचेकडून वसूलीस पात्र होत आहे. तक्रारदार यांना १४०० युनिटचे दिलेले रु. १६,०००/- चे दुरुस्त देयक योग्य आढळत नाही. त्यांना स्लॅबचा फायदा देऊन एकूण ६८० युनिटचे देयक दुरुस्त करुन देणे योग्य व वाजवी राहिल. त्यांनी रु. १६०००/- भरणा केले आहेत, असे तक्रारदारतर्फे सांगणेत आले. त्यामुळे त्यांचेकडून जादा रक्कम वसूल केली असल्यास ती पुढील देयकामधून समायोजित होणेस पात्र राहिल. तक्रारदार यांनी दरमहा ४० युनिटची (जादा) वीज यापूर्वीच म्हणजे जुलै-२०१५ पासून वापरली असल्याने व्याज देणेबाबत कोणताही आदेश करणेत येत नाही.

११) तक्रारदार यांचेतर्फे त्यांचा दरमहा वीज वापर १०० युनिटचा होता हे मान्य केले असलेने केवळ जुलै व ऑगस्ट-२०१६ ची देयके दरमहा १०० युनिटप्रमाणे देता येत नाहीत. जुलै-२०१५ पासून फरकाचे देयक दुरुस्त करणे योग्य होईल असे वाटते.

१२)तक्रारदार यांना देणेत आलेले रु. १,०१,७७०/- चे देयक अवास्त व चुकीचे आहे ही बाब स्पष्ट आहे. जरी ते देयक दुरु स्त करुन रु. १६,०००/- चे देयक देणेत आले आणि ते तक्रारदार यांनी भरणा केले म्हणून तक्रारदार यांना ते दुरुस्त देयक मान्य होते असे म्हणता येणार नाही. तक्रारदारांचे वीज बिल तात्काळ दुरुस्त करुन देणेत यावे असा अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा दिनांक ०२-१२-२०१६ चा आदेश अतिशय संदिग्ध आहे.

१३) वरील सर्व कारणास्तव तक्रारदार यांचे गा-हाणे अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## ***आदेश***

१) तक्रारदार श्री सुभाष दत्तू पाटील रा. मंगळवार पेठ, जत ता. जत. जि. सांगली यांचे प्रस्तुत गा-हाणे अंशतः खालील प्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

२) माहे जुलै आणि ऑगस्ट-२०१६ या दोन महिन्यांचे तक्रारदार यांचे दुरुस्त करुन दिलेले सोळाहजार रुपयांचे देयक रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी माहे जुलै-२०१५ ते ऑगस्ट २०१६ या चौदा महिन्यांचे ६८० युनिट वीज वापराचे देयक दुरुस्त करुन त्याना देणेत यावे त्यामध्ये स्लॅबचा फायदा देणेत यावा.

३) तक्रारदार यांनी वर नमूद केलेली सोळा हजार रुपये रक्कम यापूर्वी भरली असलेस, ६८० युनिटच्या देयकाच्या रक्कमेपेक्षा जादा वसूल केलेली रक्कम त्यांच्या या पुढील वीज देयकामधून समान हप्त्यानी समायोजित करणेत यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |